पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३३१/२०१४
दिनांक : ०९/०४/२०१४

प्रति,

मा. ...................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा
दिनांक **१९/०४/२०१४** रोजी दुपारी **२.००** वाजता आयोजित केलेबाबत...

मा.महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची **माहे एप्रिल २०१४** ची मासिक मा.महापालिका सभा **शनिवार** दिनांक **१९/०४/२०१४** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. कृपया सदर सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## सूचना

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये)

### कार्यपत्रिका क्रमांक २९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल - २०१४ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार दिनांक १९/०४/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

--------------

मा.महापालिका सभा क्र.२४ दि.२०.१२.२०१३, १०.०१.२०१४, १६.०१.२०१४ व १८.०१.२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.

--------------

### प्रश्नोत्तरे

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

--------------

### मा.स्थायी समितीचे ठराव

**विषय क्रमांक १) संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.विमुका/जा/६०६/२०१४, दि.२०/०३/२०१४.
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.६६३१ दिनांक २५/०३/२०१४

महसुली खर्च अंतर्गत वैद्यकिय विभागाकडील "अस्थायी आस्थापना" या लेखाशिर्षावरुन र.रु.८० लाखामधून वियुत विभागाचे "स्थायी आस्थापना" या लेखाशिर्षावर र.रु.५ लाख, " स्ट्रीट लाईट बील" या लेखाशिर्षावर र.रु. ७४ लाख " जनरेटर इंधन" या लेखाशिर्षावर र.रु.५० हजार आणि " वाहन इंधन" या लेखाशिर्षावर र.रु.५० हजार याप्रमाणे वर्ग करणेकामीचे प्रस्तावास मा.महापालिका सभेची कार्योत्तर मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक २) संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३/कावि/२६३/२०१४, दि.२९/०३/२०१४.
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.६६६९ दिनांक ०१/०४/२०१४

मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पुणे महानगरपरिवहन महामंडळ लि.पुणे यांनी दिनांक २१/३/१४ चे पत्रान्वये शासन निर्णय क्र. एनयुआर- २०१३/प्रक.३३८/नवि-३३ मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक १८/२/२०१४ चे पत्रात नमुद केलेनुसार महामंडळाची आर्थिक सद्यःस्थिती अत्यंत बिकट असल्याने सन २०१३-१४ च्या संभाव्य संचलन तूटी मधून (Operational losses) सदरची रक्कम समायोजीत करणेस अधिन राहून पुणे महानगरपरिवहन महामंडळ लि.पुणे यांना र.रु.१३.५० (अक्षरी र.रु.तेरा कोटी पन्नास लाख) अदा करावयाचे असल्याने तसेच सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने त्यास मान्यता देणेत आली असल्याने त्याचे अवलोकन करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

## मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे / कामे

**विषय क्रमांक ३) संदर्भ –** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. स्था/कप्र/११७/२०१४
दिनांक २६/०३/२०१४

सौ.निर्मला विजयराव तापकिर यांनी पिं.चि.मनपा निवडणुक २०१२ मध्ये निवडुन आलेल्या सौ.विनया प्रदीप तापकीर व श्री. नितीन प्रताप काळजे यांचे अनाधिकृत बांधकामाबाबत दि.२९/१२/२०१३ रोजी अर्ज दाखल केला होता. त्या अनुषंगाने त्यांनी सौ.विनया प्रदीप तापकीर व श्री.नितीन प्रताप काळजे यांचे विरुद्ध मा.उच्च न्यायालयात याचिका क्र. ३११७/२०१२ व ६२६५/२०१२ दाखल केल्या होत्या. त्यातील मा.कोर्टाच्या आदेशाप्रमाणे संबंधीत अनाधिकृत बांधकामाबाबतचा निर्णय न्यायालयाच्या कार्यकक्षेत असलेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०/१ (ड), ११ व १२ च्या तरतुदीच्या अनुषंगाने सौ.विनया प्रदीप तापकीर यांना नोटीस क्र. स्था/इक्षे/१२/२०१४ दि.१०/२/२०१४ व श्री.नितीन प्रताप काळजे यांना नोटीस क्र. स्था/इक्षे/१४/२०१४ दि. १०/२/२०१४ नुसार अनधिकृत बांधकामाबाबत खुलासा मागविणेत आला होता.

सौ.विनया प्रदीप तापकीर यांनी दि.२४/२/२०१४ रोजी सादर केलेल्या खुलास्यामध्ये सदरची मालमत्ता/बांधकामे माझे सास-याचे असले तरी ते माझ्यावर अवलंबून नाही व मी अनाधिकृत बांधकाम केलेले नाही, त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०(१) (ड) च्या तरतुदी मला लागु होत नाही, असा खुलासा सादर केला आहे.

श्री.नितीन प्रताप काळजे यांनी आपले दि.२४/२/२०१४ रोजी आपले खुलास्यामध्ये सदरची मालमत्ता/बांधकामे ही माझे वडीलांचे मालकीची असून त्या मिळकतीशी माझा काहीही संबंध नाही. माझे वडील माझेवर कोणत्याही प्रकारे अवलंबीत नाही, त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०(१) (ड), ११ व १२ च्या तरतुदीनुसार माझे विरुद्ध कोणतीही कार्यवाही प्रस्तावित करु नये असा खुलासा सादर केला आहे.

सन्मा.सदस्यांनी सादर केलेल्या खुलाशानुसार अनधिकृत बांधकामामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम ११ व १२ मधील तरतुदी अन्वये सदस्यांचे अर्हतेबाबतचा प्रश्न निर्माण झाल्याने मा.न्यायाधिशांकडुन निर्णय प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे व त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १२ मधील तरतुदी नुसार असा संदर्भ मा.न्यायालयाकडे करण्यासाठी मान्यता देणेबाबत विचार करणे.

## समित्यांचे अहवाल

## मा.महिला व बालकल्याण समिती

**विषय क्रमांक ४) अ)** दिनांक २६/०२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.
**ब)** दिनांक १२/०३/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.

## मा.शहर सुधारणा समिती

**विषय क्रमांक ५)** **अ)** दिनांक ०५/०२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.

## मा.क्रिडा समिती

**विषय क्रमांक ६)** **अ)** दिनांक ०१/०१/२०१४ व १५/१/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.

**ब)** दिनांक १५/०१/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३३१/२०१४
दिनांक : ०९/०४/२०१४

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

G.B.12-17/G.B. Agenda-२९ March-१४.doc